# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३५५ - २३** **दिनांक : - १३/१०/२०२३**

## घरफोडी चोरी करणा-या आरोपीताकडुन ५ गुन्हयांची उकल गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांची कामगीरी.

नायगाव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात फिर्यादी मालती मॅनेजर यादव वय ४८ वर्ष व्यवसाय – नोकरी रा. रुम.नं.०३ महादुर्गा वेलफेअर सोसायटी ,रामधाम आश्रमसमोर काजुप्लाट वाकीपाडा नायगाव पुर्व, ता. वसई जि. पालघर यांचे राहते घराचे पत्रे उचकटुन त्यावाटे दिनांक २५/०७/२०२३ रोजी १०.००वा .ते २५/०७/२०२३ रोजी २२.०० वा.च्या सुमारास कोणत्या तरी अज्ञात चोरटयाने घरातप्रवेश प्रवेश करुन फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीचे ईरादयाने घरफोडी चोरी केल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं २१०/२०२३ भा.द.वि.सं कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दि. २६/०७/२०२३ रोजी २०.१६ वाजता नोंद करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये सतत होणा-या घरफोडी चोरींचे प्रमाण वाढत असल्याने सदर घरफोडी चो-यांवर आळा घालणेबाबत मा. वरीष्ठांनी ओदशित केले होते. त्या अनुषंगाने घडणा-या प्रत्येक घरफोडी चोरीच्या गुन्हयाचे ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून गुप्त बातमीदाराकडील माहीतीचे व सी सी टी व्ही फुटेजच्या परीक्षणाव्दारे अनोळखी आरोपीतांचा गुन्हे शाखा कक्ष -२ वसई यांचे मार्फतीने घेण्यात येत होता. त्यानुसार नायगाव २१०/२०२३ भादविस कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे या घरफोडी चोरीच्या गुन्हयांतील आरोपीताचे नावाची उकल करुन त्यास सापळा रचुन आरोपी नामे धिरज गुलाब मौर्या वय २० वर्ष रा. चिंचोटी तलावाचे जवळ, वसई पुर्व मुळ रा ज्ञानदुर रोड, जिल्हा- भदोई, राज्य-उत्तर प्रदेश यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास केला असता सदर गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीत याचेकडे केलेल्या तपासादरम्यान त्याचेकडुन इकडील आयुक्तालयातील घरफोडीचे व ईतर चोरीचे असे एकुण ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**-: उघडकीस आलेले :-**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजी नं.व कलम |
|---|---|---|
| १. | नायगाव पोलीस ठाणे | २१०/२०२३ भा.द.वि.सं.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे (मुळ गुन्हा) |
| २. | मांडवी पोलीस ठाणे | २२८/२०२३ भा.द.वि.सं कलम ४५४, ३८० प्रमाणे |
| ३. | नालासोपारा पोलीस ठाणे | ३५४/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | तुळींज पोलीस ठाणे | २५८/२०२३ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ५. | वालीव पोलीस ठाणे | १०५२/२०२० भा.द.वि.सं कलम ४५७, ३८० प्रमाणे |

अटक आरोपीत याचेकडुन उघडकीस आणलेल्या घरफोडी व ईतर चोरीच्या एकुण ५ गुन्हयात एकुण ४,९४,०००/- रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व मोबाईल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ. रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा.प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, सायबर शाखेचे स.फौ.संतोष चव्हाण, म.सु.ब.अविनाश चौधरी, रामेश्वर केकान यांनी केली आहे.

**----0000----**